# प्रेम धवन - भाग ४



प्रश्न - लताने गायलेले 'दिवाने हम, दिवाने तुम' यासारखी तुम्ही बरीच उत्तमोत्तम गाणी लिहिलीत. तसेच 'अगर दिल किसीसे लगाया ना होता' हे गाणेही तुमचेच! त्यामागे तुमचा काही वैयक्तिक अनुभव होता का?

प्रेम धवन - अर्थातच ! इश्क जब तक रहबरी ना करे, जिंदगी राह पर नही आती I प्रेमामध्ये नेहमीच चढ उतार असतातच आणि आमच्या सारख्या कवींना प्रेमभंगाचा अनुभव चांगलाच परिणाम करतो पण त्यातही खलिश पाहिजे. गालिबचे म्हणणे तर असेच आहे ना 'कोई मेरे दिलसे पूँछे, तेरे तीर-ए-नीम कश को वोह खलिश कहाँ से होती जो जिगर के पार होता -

प्रश्न - तुमच्या 'खलिश' मुळे आम्हाला प्रदीर्घ काळ उत्तमोत्तम गाण्यांचा खजिनाच मिळाला. अगदी अलिकडच्या काळात तुम्ही कुठली गाणी लिहिली आहेत का ?

प्रेम धवन - 'अप्पू राजा'. माझी लंडनला 'बायपास सर्जरी' झाली आणि त्यानंतर गीतलेखनाची गती थोडी कमी झाली असे वाटते. त्यानंतर हर्निया आणि डोळ्याचे ऑपरेशनही झाले. आजारपणामुळे कामावर परिणाम होतोच पण शिवाय सध्या चित्रपटसृष्टीतही बराच बदल झाला आहे. लोकांची आवडही बदलली आहे. त्यामुळेही गाण्यांवर परिणाम होतोच नाही का ?

प्रश्न - तुम्ही टेलिव्हिजन पाहता का ?

प्रेम धवन - हो हो. काही जुने चित्रपट आणि काही निवडक मालिका एवढेच बघतो. तसेच मी अजूनही काही ना काही लिहीतही असतो. हा, मात्र ते फक्त माझ्या आवडीनुसार ! सध्याची सभोवतालची एकूणात परिस्थिती काही फारशी बरी नाही. माझी गीते ही मला माझ्या मुलांसारखीच आहेत. त्यांनी

मला नाव मिळवून दिले. खूप प्रसिद्धी दिली. आता मी मागणीनुसार कमी प्रतीची गाणी लिहिली तर माझे कमावलेले नाव खराब होणार नाही का ? त्यामुळे असे काही करण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

प्रश्न - पण मग आता तुम्ही वेळ कसा घालवता ?

प्रेम धवन - आता मी फावल्या वेळात अत्यंत उत्कृष्ट अशी अभिजात पुस्तके वाचतो. शेक्सपियर, डिकन्स, इ. इ. तसेच पर्शियन आणि उर्दू लेखकांची पुस्तके वाचतो. उदा. हाफिज, सादी, जानी, उमर खय्याम माझ्या आवडीचे आहेत. त्यानंतर झौक, मिर टाकी मिर, प्रेमचंद हे देखील वाचतो. मी एकदम संतुष्ट आहे, सुखी आहे. पुस्तके ही माझी मित्रमंडळी आहेत. त्यांच्यामुळे मला कधीही एकटे वाटत नाही. सध्या मी माझ्यापुरते पाहतो. मला जे आवडेल ते वाचतो, जे आवडेल ते लिहितो आणि माझ्या सुखासाठीच जगतो. तसं पाहिलं तर माझा एक 'मफतलाल डाय'च्या वितरणाचा धंदाही मी जोडीने करतो. तो उत्तम चालला आहे. आतील कर्मचारीवर्ग उत्तम काम करणारा आहे. मला त्यात फारसे लक्ष घालण्याची गरज पडत नाही.

प्रश्न - मुलाखत आटोपती घेताना सर आम्ही, (सर्व रसिकांच्या वतीने !) तुम्ही आम्हाला दिलेल्या अनमोल गाण्यांच्या खजिन्यासाठी तुमचे खूप खूप आभार मानतो. आणि आपल्याला खूप चांगले आरोग्य लाभो अशी ईश्वराकडे प्रार्थना करतो.

प्रेम धवन - मी सुद्धा तुमचे आणि सर्व रसिकांचे आभार मानतो आणि तुम्हा सर्वांवर देवाची कृपादृष्टी असावी अशी प्रार्थना करतो. धन्यवाद !

प्रेम धवन यांच्या गाण्यांपैकी काही पुढीलप्रमाणे -

| Song | Singer | Film |
|---|---|---|
| Chanda re ja re ja re | Lata | Ziddi |
| Bol papihe bol re | Lata & Sandhya M. | Tarana |
| Balma ja ja ja,... ab kaun | Lata | Aaram |
| Preetam meri duniya mein | Lata | Ada |
| Seene mein sulagte hain | Lata & Talat | Tarana |
| Halke halke chalo sanware | Lata & Hemant | Tangewali |

| Song | Singer | Film |
|---|---|---|
| Chanda mama door ke | Asha | Vachan |
| Yeh kya hai dhang zamaane | Talat | Dak Babu |
| Zindagi mein aaye jab woh | Talat | Dak Babu |
| Sub kuchh luta ke hosh mein | Talat/Lata | Ek Saal |
| Din ho ya raat hum rahen | Rafi & Suman | Miss Bombay |
| Zindagi bhar gham judaee ka | Rafi | Miss Bombay |
| Tujh mein Ram, mujh mein | Manna Dey | Pardesi |
| Haye jiya roe, roe...piya | Lata | Milan |
| Do roz mein woh pyar ka | Mukesh | Pyar Ki Rahen |
| Tumse hi meri zindagi | Mukesh & Geeta | Apna Ghar |
| Aaram hai haraam, Bharat ke naojawanon | Asha, Rafi & chorus | Apna Ghar |
| Chhodo kal ki baaten | Mukesh, chorus | Hum Hindustani |
| Akhiyan sang akhiyaan | Rafi | Bada Aadmi |
| Agar dil kisi se lagaya na | Rafi | Bada Aadmi |
| Aye mere pyaare watan | Manna Dey | Kabuliwala |
| Jaane kaisa chhaane laga | Lata | Zabak |
| Teri duniya se door chale hoke majboor | Lata & Rafi | Zabak |
| Tujh ko main jaan gayee | Lata & Rafi | Zabak |
| Mehlon ne chheen liya bachpan ka pyar mera | Lata & Mukesh | Zabak |
| Deewaane tum, deewaane hum | Lata | Bezubaan |
| Muhabbat jisko kehte hain, woh ik dhadkan | Hemant & Lata | Maa Beta |
| Jogi hum to lut gaye tere pyaar mein | Lata | Shaheed |
| Mera rang de basanti chola, | Mukesh,MK & Rajendra Mehta | Shaheed |

| Song | Singer | Film |
|---|---|---|
| O nanhe se farishte, tujhse yeh kaisa naata | Rafi | Ek Phool Do Mali |
| Tujhe suraj kahoon ya chanda | Manna Dey | Ek Phool Do Mali |
| Teri duniya se hoke majboor chala | Kishore | Pavitra Paapi |
| Aye watan, aye watan, hum ko teri qasam | Rafi & chorus | Shaheed |

प्रेम धवन यांनी फक्त गाणी रचली असे नाही तर गाण्यांना संगीतही दिले होते. वरील यादीमधील शेवटच्या दोन गाण्यांचे शब्दही त्यांचेच होते व त्यासाठी सुंदर चालीही त्यांनीच बांधल्या होत्या.

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi

cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015.
To buy his books, or otherwise write to the author, his email address
is manekpremchand@gmail.com